GLANCE FINANCE LTD
CIN No. L65920MH1994PLC081333

022-40100193
Glance Finance Ltd, 7 Kitab Mahal,
192 Dr DN Road, Mumbai 400001
www.glancefinance.in
cfo@glancefinance.in

Date: 20.05.2024

To,
Department of Corporate Services
The Bombay Stock Exchange
Phiroze Jeeieebhoy Tower,
Dalal Street, Mumbai- 400001

**Ref: Glance Finance Limited (Security Code No.: (531199)**

**Sub: Newspaper publication of extract of approval of Audited Financial Results for the quarter and year ended 31st March, 2024.**

Dear Sir,

Pursuant to the Regulation 30 of the SEBI (Listing Obligation and Disclosures Requirements) Regulation, 2015, please find attached herewith a copy of the newspaper publication of 'Extract of approval of Audited Financial Results for the quarter and year ended 31st March, 2024' approved by the Board of Directors at its meeting held on Saturday, May 18, 2024 and published in Financial Express and Pratahkal on May 19, 2024.

You are requested to kindly take the same on record.

Thanking you,

Yours faithfully,
For Glance Finance Limited

CHIRAG HASMUKH BHUPTANI
Digitally signed by CHIRAG HASMUKH BHUPTANI
Date: 2024.05.20 18:29:06 +05'30'

Chirag Bhuptani
Company Secretary and Compliance officer

# लोकसभेसाठी गृहनिर्माण संस्थांच्या सभासदांनी शंभर टक्के मतदान करावे

## मतदानासाठी मतदारांना प्रेरित करणाऱ्या गृहनिर्माण संस्थांना पारितोषिक मिळणार

## प्रकाश दरेकर यांचे जाहीर आवाहन

**मुंबई, दि. १८ (प्रतिनिधी) :** मुंबईतील लोकसभा मतदारसंघात उद्या सोमवार, २० मे रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर दि मुंबई डिस्ट्रिक्ट को-ऑप. हौसिंग फेडरेशनतर्फे गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या सभासदांनी लोकसभा निवडणुकीत शंभर टक्के मतदान करावे, असे जाहीर आवाहन मुंबई हौसिंग फेडरेशनचे अध्यक्ष प्रकाश दरेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. तसेच मतदारांना जास्तीत जास्त मतदान करण्यासाठी प्रेरित करणाऱ्या गृहनिर्माण संस्थांना पारितोषिकही देण्यात येणार असल्याचे प्रकाश दरेकर यांनी म्हटले आहे.

मुंबई हौसिंग फेडरेशनने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात दरेकर यांनी म्हटले आहे की, आपल्या संस्थेतील सर्व सभासदांना लोकसभेच्या निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी उपकृत करावे व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी, संचालकांनी संस्थेच्या सभासदांना मतदान प्रक्रियेत शंभर टक्के मतदान करून घेण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करावेत. आवश्यक ते सर्व जनजागृतीपर उपक्रम राबवून मतदानाचा टक्का वाढविण्याचा प्रयत्न करावा. मतदान कोणाला, कोणत्या पक्षाला करतील याच्याशी आपला संबंध नाही. गृहनिर्माण संस्थांतील सर्व सभासदांची नावे मतदार यादीत आहेत की नाही याची खात्री करावी. मतदार यादीत नाव तपासणीसाठी voter help line app डाउनलोड करा किंवा electoralsearch.eci.gov.in या संकेतस्थळावर लॉगिन करा. तसेच मतदार मदत क्रमांक १९५०/०२२-२०८२२६९३ या हेल्पलाईन क्रमांकावर संवाद साधून या माध्यमातून मतदार यादीतील नावाची खात्री करू शकतात. याबाबत आपल्या संस्थेतील सभासदांनी माहिती देणे, वोटर गाईड व वोटर स्लिप घरोघरी पोहोचेल याची खातरजमा करून घ्यावी. तसेच ज्या गृहनिर्माण संस्थेने पुढाकार घेऊन मतदारांना मतदानासाठी प्रेरित केल्यामुळे जास्त मतदान झाले आहे अशा प्रत्येक विभागातील किमान १० गृहनिर्माण संस्थांना सहकार विभागातर्फे प्रशस्तीपत्रक किंवा पारितोषिक देण्यात येणार आहे. लोकशाहीच्या या पवित्र उत्सवात शंभर टक्के मतदान करून प्रत्येक सभासदाने व त्याच्या कुटुंबियांनी मतदान प्रक्रियेत सहभागी होऊन आपल्या मतदानाचा अधिकार बजवावा, असे आवाहनही प्रकाश दरेकर यांनी केले आहे.

### शुद्धीपत्र

**गणेश सिद्धी सी.एच.एस लि.** या सोसायटीच्या वतीने दि. **१८/०५/२०२४** रोजी दिलेली या वर्तमानपत्रात जाहीर सूचना मध्ये सभासदाचा नाव चूकीने **श्रीम. रांजण डी. पांचाळ** असे नमूद केले गेले त्याएवजी **श्रीमती रंजन डी. पांचाळ** असे वाचाण्यात यावे चूकी बदल दिलगीरी.

सही/-
सन्मा. सचिव.

### पश्चिम रेल्वे

**कोल्ड रूमची तरतूद**

वरिष्ठ डीईई/पी/बीसीटी हे ई-निविदा सूचना क्र. : **EL 81/7/901/WA/79 (R) dated 16.05.2024** मागवीत आहेत. **कार्य व ठिकाण :** जगजीवन राम रुग्णालय/ मुंबई सेंट्रल – जे. आर. रुग्णालय येथे आयसीयू, एमआयसीयू, डायलीसीस रूम, पॅसेज, किचन पँट्री, शौचालये, लिफ्ट क्षेत्र व डक्ट आदींचे नवीकरण व सुधारणा कामांच्या संबंधात कोल्ड रूमची तरतूद. **कामाचे अंदाजित मूल्य :** रु. १३,९१,५८०.००/-, **बोली सुरक्षा मूल्य :** रु. २७,८००/-, **सादरीकरणाची तारीख व वेळ :** दि. १०.०६.२०२४ रोजी ३.०० पर्यंत. **उघडण्याची तारीख व वेळ :** दि. १०.०६.२०२४ रोजी ३.३० वा. **टीप :** अधिक माहितीकरिता कृपया आमची वेबसाइट www.ireps.gov.in ला भेट द्यावी. 0157

: facebook.com/WesternRly

# निवडणूक निरीक्षकांनी घेतला निवडणुकीच्या तयारीचा आढावा

**मुंबई, दि. १८ (प्रतिनिधी) :** निवडणूक निरीक्षक अजयसिंग तोमर यांनी आज दि.१६ मे रोजी लोकसभा निवडणुकीच्या तयारीच्या अनुषंगाने वसई विरार शहरास भेट देऊन निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला. महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त अनिलकुमार पवार यांनी निवडणूक निरीक्षक महोदयांचे स्वागत केले. यावेळी अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे, अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे तसेच सहा.निवडणूक निर्णय अधिकारी शेखर घाडगे, पोलीस उप-आयुक्त जयंत बजबळे, मनपा उप-आयुक्त नानासाहेब कामठे व इतर अधिकारी उपस्थित होते.

निवडणूक निरीक्षक यांनी सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण करणाऱ्या व विनापरवाना लावण्यात आलेल्या निवडणूक संदर्भातील जाहिराती यांची पाहणी करून त्यांचेवर वेळीस कारवाई होईल याची दक्षता घेण्याची सूचना दिली. यासंदर्भात महानगरपालिका प्रशासनाकडून प्रभाग कार्यालयांना सूचना देण्यात येऊन अशा जाहिराती संदर्भात कारवाई करण्यात येत असल्याचे मा.निवडणूक निरीक्षक यांना अवगत करण्यात आले. मा.निवडणूक निरीक्षक यांनी काही महत्वाच्या मतदान केंद्रांना भेट देऊन तेथील नियोजनाची पाहणी केली तसेच एस.एस.टी. नाक्यांनाही भेट दिली.

महानगरपालिकेमार्फत वसई विरार क्षेत्रातील ९११ मतदान केंद्रांवर किमान आवश्यक सुविधा देण्यात येत आहे. त्यामध्ये पिण्याचे पाणी, लाईट-पंखे व्यवस्था, मंडप व्यवस्था, दिव्यांगांसाठी रॅम्प व्यवस्था इ. बाबींची पूर्तता महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सर्व मतदान केंद्रांवर प्राथमिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करण्यात आली असून प्रत्येक मतदान केंद्रावर १ आशा वर्कर व १ ए.एन.एम तसेच ५ मतदान केंद्रामागे १ डॉक्टर याप्रमाणे नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर मेडिकल कीट देण्यात येणार असून ३० रुग्णवाहिका ची व्यवस्था करण्यात आली आहे. मतदान केंद्रावर दिव्यांगांसाठी व्हीलचेयर सुविधा पुरविण्यात येत आहे. महानगरपालिकेमार्फत एकूण ३६७ व्हीलचेयर उपलब्ध करण्यात आले आहेत. तसेच मतदान जनजागृती करून मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी महानगरपालिकेमार्फत विविध जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.अशा पद्धतीने महानगरपालिका निवडणुकीसाठी तत्पर असल्याचे मा.निवडणूक निरीक्षक यांना अवगत करण्यात आले.

### जाहीर सूचना

सर्व संबंधित यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, माझे अशील **श्री. निलेश नेमीचंद बोहरा व श्रीम. निधी निलेश बोहरा** हे दुकान क्र. १८, तळ मजला, तिरूपती ग्रेंड, तिरूपती नगर, फेज-१, विजय वल्लभ हॉस्पिटलजवळ, विरार (पश्चिम), तालूका वसई, जिल्हा पालघर ४०१ ३०३ येथील मालमत्तेचे कायदेशीर मालक आहेत.

माझे अशील यांनी सदर दुकान जागा **श्रीम. वसुमती कांतीलाल छालालीया व श्रीम. अल्पा एम. छालालीया** यांना विक्री करार दि. ०१.०३.२०१९ रोजी नोंदणीकृत अनु. क्र. वसई५-१७९१-२०१९ दि. ०२.०३.२०१९ अंतर्गत खरेदी केले होते.

सदर **श्रीम. वसुमती कांतीलाल छालालीया व श्रीम. अल्पा एम. छालालीया** यांनी सदर दुकान जागा **श्री. विनोद आर. गुप्ता व श्री. धर्मेंद्र एच. सांघवी** यांच्याकडून विक्री करार दि. ०२.०५.२०१७ अंतर्गत नोंदणीकृत करून अनु. क्र. वसई५-२७३८-२०१७ दि. ०२.०५.२०१७ अंतर्गत खरेदी केला होता.

सदर **श्री. विनोद आर. गुप्ता व श्री. धर्मेंद्र एच. सांघवी** यांनी सदर दुकान जागा मे. वाधवाना हाऊसिंग डेव्हलोपमेंट ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर कं. यांच्याकडून करार दि. ३०.१०.२०१५ अंतर्गत नोंदणीकृत अनु.क्र. वसई-२-७४७९-२०१५ दि. ३०.१०.२०१५ अंतर्गत खरेदी केला होता.

सदर मूळ करार दि. ३०.१०.२०१५ रोजी मे. वाधवा हाऊसिंग डेव्हलोपमेंट ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर कं. व **श्री. विनोद आर. गुप्ता व श्री. धर्मेंद्र एच. सांघवी** यांच्या दरम्यान अंमलात आणले होते ते करार गहाळ/ हरवले आहेत व सदर माझे अशील यांच्याद्वारे सापडत नाही आहेत व त्यामुळे त्यांनी गहाळ तक्रार धारक गहाळ अहवाल क्र. १५६८४-२०२४ दि. १८.०५.२०२४ अंतर्गत अर्नाळा पोलीस स्टेशन येथे दाखल केली होती.

जर कोणाही व्यक्तीस सदर निर्देशित मूळ करार संबंधात कोणतेही हक्क, अधिकार, हितसंबंध वा दावे असल्यास त्यांनी मला संपर्क साधावा तसेच संबंधित दस्तावेज यांच्यासह सदर दुकानाच्या संबंधात सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून ०७ दिवसांच्या कालावधीच्या आत मला सूचित करावे अन्यथा कोणतेही दावे वा हक्क नसल्याचे गृहित धरले जाईल व सदर दावे अधित्यागीत मानले जातील.

सही/-
मनिष बी. के. शुक्ला
(वकील उच्च न्यायालय)

दि. १९.०५.२०२४
मो. ८१०८२०८०५६
पत्ता : बी-११, वर्टेक्स विकास बिल्डींग, अंधेरी पोलीस स्टेशनच्या पुढे, अंधेरी (पू), मुंबई ४०० ०६९.

### पश्चिम रेल्वे

**विविध प्रकारचे कार्य**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यूए), पश्चिम रेल्वे, ६ वा मजला, अभि. विभाग, मुंबई सेंट्रल, मुंबई ४०० ००८ हे ई-निविदा मागवीत आहेत.

| अनु. क्र. | निविदा सूचना क्र. व तारीख | कार्य व ठिकाण | कामाचे अंदाजित मूल्य रु. मध्ये | इरठे रु |
|---|---|---|---|---|
| १. | BCT/24-25/46 Dtd. 16.05.2024 | **झोन-८ए-विरार-जोरावसन अनुभाग :** विरार (वगळता) व उंबरगाव (समाविष्ट) दरम्यान किमी ६०.७६ ते किमी १४५.१३० किमी दरम्यान एसएसई/डब्ल्यू/डहाणू रोड यांच्या कार्यकक्षेमध्ये सामान्य दुरुस्ती व रंगकाम, व्हाईट वॉशिंग, कलर वॉशिंग, डिस्टेम्परिंग, पॉलिशिंग आदी. | रु. ४३,२६,९०७.५० | रु. ८६५००.०० |
| २. | BCT/24-25/47 Dtd. 16.05.2024 | **झोन-८बी-विरार-जोरावसन अनुभाग :** किमी ६०.७६ ते किमी १४५.१३ पर्यंत एडीईएन/ डहाणू रोड यांच्या अनुभागामध्ये ब्रिजेसकरिता सामान्य दुरुस्ती, रंगकाम आदी. | रु. ७७,८९,३३४.१० | रु. १५५८००.०० |
| ३. | BCT/24-25/48 Dtd. 16.05.2024 | **झोन-९बी-विरार-जोरावसन अनुभाग :** वलसाड येथे लोको शेड, सीॲन्डडब्ल्यू डेपो समवेत उंबरगाव (वगळता) व जोरावसन (वगळता) दरम्यान किमी १४५.१३० ते किमी २१२ दरम्यान एसएसई/डब्ल्यू/वलसाड यांच्या कार्यकक्षामध्ये सामान्य दुरुस्ती व रंगकाम, व्हाईट वॉशिंग, कलर वॉशिंग, डिस्टेम्परिंग, पॉलिशिंग आदी. | रु. १,३२,२४,५०२.६९ | रु. २१६१००.०० |
| ४. | BCT/24-25/49 Dtd. 16.05.2024 | झोन-९बी-विरार-जोरावसन अनुभाग : किमी १४५ ते २१२ दरम्यान एडीईएन/ वलसाड यांच्या अनुभागामध्ये ब्रिजेसकरिता सामान्य दुरुस्ती, रंगकाम आदी. | रु. ७९,७०,१३४.१० | रु. १५९४००.०० |

**वरील निविदेकरिता सादरीकरणाची तारीख व वेळ : दि. ११.०६.२०२४ रोजी दु. ३.०० वा. उघडण्याची तारीख व वेळ : दि. ११.०६.२०२४ रोजी ३.३० वा. टीप :** अधिक माहितीकरिता कृपया आमची वेबसाइट www.ireps.gov.in ला भेट द्यावी. 0155

: facebook.com/WesternRly • : twitter.com/WesternRly

# नगरपालिकेच्या व्यायामशाळेचे काम सुरू असतांना दुर्घटनेत मजुराचा मृत्यू

## नगरपालिका व पोलीस प्रशासनाकडून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न?

**अंबरनाथ, दि. १८ (वार्ताहर) :** अंबरनाथ नगरपालिका द्वारे बांधण्यात येणाऱ्या अद्यावत व्यायाम शाळेचे बांधकाम सुरू असतांना परांची वरून पडून एका मजुराचा मृत्यू झाला आहे. पोलिसांनी या घटनेची आकस्मित मृत्यू म्हणून नोंद केली आहे. सुरक्षितेच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारची काळजी घेतली नसल्याचे या घटनेवरून दिसून येते आहे.



अंबरनाथ (पूर्व) येथील गावदेवी मैदानात जुन्या व्यायामशाळेच्या जागेवर अद्यावत व्यायामशाळा येत आहे. शासनाच्या नगरोत्थान अभियान अंतर्गत निधी मधून ५० लाख रुपये नगरपालिकेला देण्यात आले असून त्या निधी मधून या व्यायाम शाळेचे बांधकाम सुरू आहे.

७ मे रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास या व्यायामशाळेला रंगरंगोटी देण्याच्या कामासाठी बांबूची परांची बांधण्यात आली होती. यानंतर परांची खोलण्याचे काम सुरू असतांना खाली पडून एक अज्ञात मजुर गंभीररीत्या जखमी झाला होता. यावेळी साईट सुपरवायझर सादिक डांगे आणि अन्य मजूर मलप्पा आदीमनी यांनी जखमी मजुराला छाया रुग्णालय या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. यानंतर मृताचे शव हे शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले होते. या संदर्भात अंबरनाथ नगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता राजेश तडवी यांना विचारले असता या घटने बाबत आपणास माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले तर या इमारतीचे बांधकाम करणाऱ्या गणेश कन्स्ट्रक्शनच्या मालकाशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही, या इमारतीच्या बाजूलाच शिवाजीनगर पोलीस ठाणे असून पोलीस अधिकारी व कर्मचारी हे ही घटना आणि मृताविषयी अधिक माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहेत. या दुर्घटनेबाबत शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक अशोक भगत यांना विचारले असता ते म्हणाले की मृताच्या नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेऊन त्याच्यावर अंत्यसंस्कार केले आहेत तसेच नातेवाईकांची कोणतीही तक्रार नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. या प्रकरणाचा अधिक तपास एस डी चौरे हे करीत आहेत.

### जाहीर सूचना

सूचना याद्वारे आम जनतेस आमचे अशील **ब्रिजेश माधवनकुत्ती मेनन** यांच्या वतीने देण्यात येते की, ते **फ्लॅट क्र. ३०१, तिसरा मजला, ए विंग, बिल्डींग डेविड पॅलेस को-ऑप. हा. सो. लि., भारती पार्कच्या मागे, मीरा रोड (पू), जिल्हा ठाणे ४०१ १०७** (यापुढे सदर फ्लॅट म्हणून संदर्भित) संबंधात मालमत्तेचे रहिवासी आहेत.

सदर फ्लॅट संयुक्तरित्या **१. श्री. एम. ब्रिजेश मेनन २. श्री. पी. एस. माधवन कुत्ती** यांच्याद्वारे **श्रीम. चंद्रवथी शंकर बांगेरा** यांच्याकडून नोंदणीकृत विक्री करार दि. २६.०२.२००७ रोजी दस्तावेज क्र. **टीएनएन-७-०१६८७-२००७** दि. २६.०२.२००७ रोजी खरेदी केला होता.

ज्याअर्थी दिवंगत **श्री. पी. एस. माधवन कुत्ती** यांचा मृत्यू दि. ०२.०४.२००९ रोजी झाला होता त्यांच्या मागे **१. विनीता माधवन कुत्ती मेनन (पत्नी) २. माधवनकुत्ती राजेश मेनन (मुलगा) ३. पुर्णीमा माधवन कुत्ती मेनन (मुलगी) ४. ब्रिजेश माधवनकुत्ती मेनन (मुलगा)** हे केवळ कायदेशीर वारस आहेत.

ज्याअर्थी वारस **१. विनीता माधवन कुत्ती मेनन (पत्नी) २. माधवनकुत्ती राजेश मेनन (मुलगा) ३. पुर्णीमा माधवन कुत्ती मेनन (मुलगी)** यांनी सदर फ्लॅट संबंधातील त्यांचे हक्क, अधिकार व हितसंबंध आमचे अशील **ब्रिजेश माधवनकुत्ती मेनन** यांच्या नावे रिलीज व रिलींक्वीशड करण्याचा निर्णय घेतला आहे.

आमचे अशील, सदर प्रसिद्धी मार्फत याद्वारे आम जनतेस सूचित करत आहेत की, जर कोणाही व्यक्तीस सदर फ्लॅट व/वा शेअर्स वा कोणत्याही भागाच्या संबंधात काही असल्यास दावे वा हक्क, अधिकार, हितसंबंध असल्यास तसेच वारसा, शेअर, विक्री, खरेदी, गहाण, भाडेकरार, धारणाधिकार, परवाना, भेट, जप्ती वा अडथळे काही असल्यास वा अन्य काही असल्यास त्यांनी संबंधित दावे खालील निर्देशित आमच्या कार्यालय पत्त्यावर संबंधित दावे सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा दावे काही असल्यास सदर व्यक्तींचे दावे अधित्यागीत व/वा परित्यागीत मानले जातील व आमचे अशील याकरिता बंधनकारक नसतील.

**(राजेंद्र सिंह राजपुरोहित)**
**वकील उच्च न्यायालय, मुंबई**
दुकान क्र. ९, अस्मीता ओरिएन्ट सीएचएस लि., अस्मीता क्लबजवळ, मीरा रोड (पू), ठाणे : ४०१ १०७.

### पश्चिम रेल्वे

**विविध प्रकारचे कार्य**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यूए), पश्चिम रेल्वे, ६ वा मजला, अभि. विभाग, मुंबई सेंट्रल, मुंबई ४०० ००८ हे ई-निविदा मागवीत आहेत.

| अनु. क्र. | निविदा सूचना क्र. व तारीख | कार्य व ठिकाण | कामाचे अंदाजित मूल्य रु. मध्ये | इरठे रु |
|---|---|---|---|---|
| १. | BCT/24-25/54 Dtd. 17.05.2024 | **झोन १०ए : जोरावसन-सुरत अनुभाग :** जोरावसन (समाविष्ट) व सचिन (समाविष्ट) व बिलीमोरा – वाघाई नॅरो गॉज सेक्शन (किमी ०.० ते ६२.५०) बिलीमोरा (वगळता) व वाघाई (समाविष्ट) दरम्यान किमी २१२ ते किमी २५०.५९ दरम्यान एसएसई/डब्ल्यू/ बिलीमोरा यांच्या कार्यकक्षेमध्ये सामान्य दुरुस्ती व रंगकाम, व्हाईट वॉशिंग, कलर वॉशिंग, डिस्टेम्परिंग, पॉलिशिंग आदी. | रु. ४४,६०,८५४.५० | रु. ८९२००.०० |
| २. | BCT/24-25/55 Dtd. 17.05.2024 | **झोन ११ए : जोरावसन - सुरत अनुभाग :** सचिन (वगळता) व सुरत (समाविष्ट) दरम्यान किमी २५०.५९ ते किमी २६८.८९ दरम्यान एसएसई/डब्ल्यू/ सुरत यांच्या कार्यकक्षेमध्ये सामान्य दुरुस्ती व रंगकाम, व्हाईट वॉशिंग, कलर वॉशिंग, डिस्टेम्परिंग, पॉलिशिंग आदी. | रु. १,०३,००,७९१.५० | रु. २०१५००.०० |
| ३. | BCT/24-25/56 Dtd. 17.05.2024 | **झोन ११बी : जोरावसन - सुरत अनुभाग :** एडीईएन/ सुरत यांच्या अनुभागामध्ये ब्रिजेसकरिता सामान्य दुरुस्ती, रंगकाम आदी. | रु. ९३,२८,३५६.९० | रु. १८६६००.०० |
| ४. | BCT/24-25/57 Dtd. 17.05.2024 | **झोन १२ए : उधना - उकाई - सोनगड सेक्शन :** उधना (वगळता) व उकाई सोनगड (समाविष्ट) दरम्यान किमी ०.०० ते किमी ७७.६० दरम्यान एसएसई (डब्ल्यू) व्हीवायए यांच्या कार्यकक्षेमध्ये सामान्य दुरुस्ती व रंगकाम, व्हाईट वॉशिंग, कलर वॉशिंग, डिस्टेम्परिंग, पॉलिशिंग आदी. | रु. ४३,४१,२७३.०० | रु. ८६८००.०० |
| ५. | BCT/24-25/58 Dtd. 17.05.2024 | **झोन १२बी : उधना - उकाई -सोनगड अनुभाग :** उधना (वगळता) व उकाई सोनगड (समाविष्ट) दरम्यान किमी ३.१८० ते किमी ७७.६० दरम्यान एईएन – व्यारा यांच्या कार्यकक्षेमध्ये सामान्य दुरुस्ती व रंगकाम, व्हाईट वॉशिंग, कलर वॉशिंग, डिस्टेम्परिंग, पॉलिशिंग आदी. | रु. ६०,००,०००.०० | रु. १२००००.०० |

**वरील निविदेकरिता सादरीकरणाची तारीख व वेळ : दि. ११.०६.२०२४ रोजी दु. ३.०० वा. उघडण्याची तारीख व वेळ : दि. ११.०६.२०२४ रोजी ३.३० वा. टीप :** अधिक माहितीकरिता कृपया आमची वेबसाइट www.ireps.gov.in **ला भेट द्यावी. हस्ते प्रस्ताव गृहित धरले जाणार नाहीत.** 0160

: facebook.com/WesternRly • : twitter.com/WesternRly

### पश्चिम रेल्वे

**विविध प्रकारचे कार्य**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यूए), पश्चिम रेल्वे, मुंबई सेंट्रल, मुंबई ४०० ००८.

| अनु. क्र. | निविदा सूचना क्र. व तारीख | कार्य व ठिकाण | कामाचे अंदाजित मूल्य रु. मध्ये | इरठे रु |
|---|---|---|---|---|
| १. | BCT/24-25/40 Dtd. 16.05.2024 | **उकाई सोनगड - जळगाव अनुभाग :** डीईएन/ पूर्व कार्यकक्षा अंतर्गत हिवाळा, पावसाळा पेट्रोलिंग दरम्यान कंत्राटी लेबर द्वारे लूज फास्टनिंग व फिटींगची पडताळणी, पेट्रोलींग, रिकुपींग करण्याद्वारे ट्रॅकची सुरक्षा. | रु. १,५५,४०,९९०.०० | रु. २,२७,७००.०० |
| २. | BCT/24-25/41 Dtd. 16.05.2024 | **१३/ए : उकाई सोनगड - जळगाव अनुभाग :** उकाई सोनगड (वगळता) नंदुरबार (वगळता) दरम्यान किमी ७७.६० ते किमी १५४.६२२ किमी दरम्यान एसई (डब्ल्यू) एनडब्ल्यूयू यांच्या कार्यकक्षेमध्ये सामान्य दुरुस्ती व रंगकाम, व्हाईट वॉशिंग, कलर वॉशिंग, डिस्टेम्परिंग, पॉलिशींग आदी. | रु. ५९,५८,७१०.८१ | रु. १,१९,२००.०० |
| ३. | BCT/24-25/42 Dtd. 16.05.2024 | **१४/ए : उकाई सोनगड - जळगाव अनुभाग :** नंदुरबार (समाविष्ट) सिंदखेडा (समाविष्ट) दरम्यान किमी १५४.६२२ ते किमी २१२.४८२ किमी दरम्यान एसएसई (डब्ल्यू) एनडीडब्ल्यू यांच्या कार्यकक्षेमध्ये सामान्य दुरुस्ती व रंगकाम, व्हाईट वॉशिंग, कलर वॉशिंग, डिस्टेम्परिंग, पॉलिशींग आदी. | रु. १,२२,६०,१७२.५१ | रु. २,११,३००.०० |
| ४. | BCT/24-25/43 Dtd. 16.05.2024 | **१५/ए : उधना - जळगाव अनुभाग :** सिंदखेडा (वगळता) ते जळगाव (वगळता) दरम्यान किमी २१२.४८२ ते किमी ३०१.४७० किमी दरम्यान एसएसई (डब्ल्यू) एएन यांच्या कार्यकक्षेमध्ये सामान्य दुरुस्ती व रंगकाम, व्हाईट वॉशिंग, कलर वॉशिंग, डिस्टेम्परिंग, पॉलिशींग आदी. | रु. ९५,०२,४८५.४४ | रु. १,९०,१००.०० |
| ५. | BCT/24-25/44 Dtd. 16.05.2024 | **क्षेत्र क्र. १४/बी : उकाई सोनगड - जळगाव अनुभाग :** उकाई सोनगड (वगळता) ते सिंदखेडा (समाविष्ट) दरम्यान किमी ७७.६० ते किमी २१२.४८२ किमी दरम्यान एडीईएन/ नंदुरबार यांच्या कार्यकक्षेमध्ये पूलाची सामान्य दुरुस्ती व रंगकाम आदी. | रु. ६०,००,०००.०० | रु. १,२०,०००.०० |
| ६. | BCT/24-25/45 Dtd. 16.05.2024 | **क्षेत्र क्र. १५/बी : उकाई सोनगड - जळगाव अनुभाग :** सिंदखेडा (वगळता) ते जळगाव (समाविष्ट) दरम्यान किमी २१२.४८२ ते किमी ३०१.४७० किमी दरम्यान एडीईएन/ अमळनेर यांच्या कार्यकक्षेमध्ये पूलाकरिता सामान्य दुरुस्ती व रंगकाम आदी. | रु. ६०,००,०००.०० | रु. १,२०,०००.०० |

**वरील निविदेकरिता सादरीकरणाची तारीख व वेळ : दि. ११.०६.२०२४ रोजी दु. ३.०० वा. उघडण्याची तारीख व वेळ : दि. ११.०६.२०२४ रोजी ३.३० वा. टीप :** अधिक माहितीकरिता कृपया आमची वेबसाइट www.ireps.gov.in ला भेट द्यावी. हस्ते प्रस्ताव गृहित धरले जाणार नाहीत. 0156

: facebook.com/WesternRly • : twitter.com/WesternRly

# नरेंद्र मोदींसाठी कुणाल पाटील फाऊंडेशनचे कल्याण लोकसभेत महायुतीला समर्थन

## माजी मंत्री, खासदार, मराठा क्रांती मोर्चा समन्वयक यांनी घेतली फाऊंडेशनची भेट

**कल्याण, दि. १८ (वार्ताहर) :** नरेंद्र मोदींना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी कुणाल पाटील फाऊंडेशनने कल्याण लोकसभेत महायुतीचे उमेदवार डॉ. श्रीकांत शिंदे यांना समर्थन दिले असून माजी मंत्री, खासदार, मराठा क्रांती मोर्चा समन्वयक यांनी कुणाल पाटील फाऊंडेशनची आणि कुणाल पाटील यांच्या मातोश्री शोभा पातील यांची भेट घेतली यावेळी फाऊंडेशनच्या वतीने हे समर्थन देण्यात आले. देशात सर्वात मोठ्या निवडणुकीकडे पहिले जाते त्या लोकसभेच्या निवडणूकीचे मतदान येत्या सोमवारी २० मे रोजी होत आहे. याच पार्श्वभूमीवर आमदार आणि माजी मंत्री अर्जुन खोतकर, खासदार हेमंत पाटील आणि मराठा क्रांती मोर्चा समन्वयक महेश डोंगरे, प्रसिद्ध




गायक शिंदे परिवार असे प्रमुख पाहुणे यांनी कल्याणमध्ये कुणाल दादा पाटील फाऊंडेशन, कार्यकर्ते आणि जनतेस भेट देण्यासाठी शुक्रवारी सायंकाळी कुणाल दादा पाटील जनसंपर्क कार्यालय येथे भेट देऊन मार्गदर्शन केले.

यावेळी नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान बनविण्यासाठी कुणाल पाटील फाऊंडेशनच्या वतीने कल्याण लोकसभेत महायुतीचे उमेदवार डॉ. श्रीकांत शिंदे यांना समर्थन देण्यात आले आहे.

येणाऱ्या निवडणूकीच्या संदर्भात सर्व मान्यवरांनी कुणाल दादा पाटील फाऊंडेशन आणि विभागातील असंख्य कार्यकर्ते आणि जनतेस मार्गदर्शन केले आणि फाऊंडेशनने महायुतीला दिलेल्या समर्थनाबाबत शोभा पाटील आणि सर्व कार्यकर्त्यांचे आभार देखील मानले.

### एरिस इंटरनॅशनल लिमिटेड

(सीआयएन : L29130MH1995PLC249667)
नोंदणीकृत कार्यालय पत्ता : आयएनएस टॉवर, ७ वा मजला, कार्यालय क्र. ७०७, ए विंग, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.
ई-मेल : arisinternationalltd@gmail.com वेबसाइट : www.arisinternational.in
दूर. ०२२-४२१५३४७९ व ९१-९२२३४००४३४

**दि. ३१ मार्च, २०२४ रोजी संपलेल्या तिमाही व वर्ष अखेरकरिता लेखापरीक्षित वित्तीय अहवालाचा निष्कर्ष**

| विवरण | स्थायी (रु. लाखात) तिमाही अखेर ३१.०३.२०२४ | तिमाही अखेर ३१.१२.२०२३ | तिमाही अखेर ३१.०३.२०२३ | वर्ष अखेर ३१.०३.२०२४ | वर्ष अखेर ३१.०३.२०२३ |
|---|---|---|---|---|---|
| कार्यचलनामधून एकूण महसूल (निव्वळ) | ५.७७ | १८.७२ | १.८० | ३४.९८ | ३५.५५ |
| करपूर्व सामान्य उपक्रमातून निव्वळ नफा/(तोटा) | ६.०४ | १७.६२ | (७.२३) | १२.७६ | (३५.३९) |
| करपश्चात सामान्य उपक्रमातून निव्वळ नफा/(तोटा) | ६.०४ | १७.६२ | (७.२३) | १२.७६ | (३५.३८) |
| करपूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अतिविशेष बाबी पश्चात) | ६.०४ | १७.६२ | (७.२३) | १२.७६ | (३५.३८) |
| करपश्चात कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अतिविशेष बाबी पश्चात) | ६.०४ | १७.६२ | (७.२३) | १२.७६ | (३५.३८) |
| प्रदानित इक्विटी भाग भांडवल (दर्शनी मूल्य रु. १०/- प्रत्येकी इक्विटी शेअर) | १५०.०० | १५०.०० | १५०.०० | १५०.०० | १५०.०० |
| राखीव (गत वर्षाच्या ताळेबंद अनुसार मूल्यांकन राखीव वगळता) | (९१.५५) | (९७.५९) | (१०४.३१) | (९१.५५) | (१०४.३१) |
| उत्पन्न प्रति शेअर (अतिविशेष बाबींपूर्व) (रु. १०/- प्रत्येकी) | | | | | |
| मूळ | ०.४० | १.१७ | - | ०.८५ | - |
| सौमय | ०.४० | १.१७ | - | ०.८५ | - |
| उत्पन्न प्रति शेअर (अतिविशेष बाबींपश्चात) (रु. १०/- प्रत्येकी) | | | | | |
| मूळ | ०.४० | १.१७ | - | ०.८५ | - |
| सौमय | ०.४० | १.१७ | - | ०.८५ | - |

**टीप :**
१. गत वर्ष/ कालावधीची आकडेवारी पुन:निर्धारित/पुन:वर्गीकृत करणे आवश्यक आहे.
२. वरील अहवाल सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन २०१५ च्या विनियमन ३३ अनुपालन प्रसिद्ध केली होती व लेखा समिती द्वारे संचालक मंडळाच्या सभेद्वारे दि. १८ मे, २०२४ रोजी मंजूर केली होती. वित्तीय अहवाल भारतीय लेखा अहवाल (आयएनडी एएस) अनुसार कंपनी (भारतीय लेखा अहवाल) नियम २०१५ व कंपनी (भारतीय लेखा अहवाल) सुधारित नियम २०१६ च्या अनुच्छेद १३३ अंतर्गत विहित स्वरूपात आहे. चालू तिमाही कंपनीच्या वैधानिक लेखापाल यांच्याद्वारे पाहण्यात आला आहे.
३. आयएनडी एएस कॉम्पीएन्ट संबंधित तिमाही ची आकडेवारी व गत वर्ष मर्यादित अहवाल अनुसार आहे. त्यामुळे व्यवस्थापनाने स्पष्ट व पारदर्शक पद्धतीने सदर वित्तीय अहवाल पाहणे आवश्यक आहे.
४. कंपनी आयएनडी एएस-१०८ ऑपरेटिंग सेगमेंट म्हणून एक सेगमेंट कार्यतर आहे व कंपनीला लागू होत नाही.
५. कराकरिता तरतूद कर दायित्व इनकम टॅक्स ॲक्ट, १९६१ च्या ११५जेबी अंतर्गत प्रदानीत आहे.

एरिस इंटरनॅशनल लिमिटेडकरिता
सही/-
नितीन कुमार भालोतिया
व्यवस्थापकीय संचालक

ठिकाण : मुंबई
दि. १८.०५.२०२४

### ग्लॅन्स फायनान्स लिमिटेड

सीआयएन : L65920MH1994PLC081333
७, किताब महल, १९२, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१.
ईमेल : glance@glancefin.com वेबसाइट : www.glancefinance.in दूर. क्र. : ४०१००१९३

**दि. ३१ मार्च, २०२४ रोजी संपलेल्या तिमाही व वर्ष अखेरकरिता लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्शांवर अहवाल**

(रु. लाखांत) ईपीएस वगळता

| अ. क्र. | तपशील | तिमाही अखेर ३१.०३.२०२४ लेखापरीक्षित | वर्ष अखेर ३१.०३.२०२४ लेखापरीक्षित | तिमाही अखेर ३१.०३.२०२३ लेखापरीक्षित |
|---|---|---|---|---|
| १. | कामकाजातून एकूण महसूल | ९३३.०० | २,३२३.५० | २३१.१४ |
| २. | कालावधीकरिता निव्वळ नफा/ तोटा (कर पूर्व, अतिरिक्त व अतिविशेष बाबी) | ९१.५६ | ३३२.२९ | ८.५६ |
| ३. | कर पूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/ तोटा (अतिरिक्त व/वा अतिविशेष बाबी पश्चात) | ९१.५६ | ३३२.२९ | ८.५६ |
| ४. | कर पश्चात कालावधीकरिता निव्वळ नफा/ तोटा (अतिरिक्त व/ वा अतिविशेष बाबी पश्चात) | ५६.६५ | १९४.०८ | ३०.६८ |
| ५. | कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता समाविष्ट नफा /(तोटा) (कर पश्चात) व अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (कर पश्चात) | (१९.७७) | १,१२९.१७ | २१.४७ |
| ६. | इक्विटी भाग भांडवल | २२७.५२ | २२७.५२ | २२७.५२ |
| ७. | उत्पन्न प्रति शेअर (रु. १०/- प्रत्येकी) | | | |
| | मूळ | २.५१ | ८.६० | १.३६ |
| | सौम्यीकृत | २.५१ | ८.६० | १.३६ |

टीप :
१. वरील वित्तीय अहवाल लेखा समितीद्वारे पाहण्यात आला आहे व दि. १८ मे, २०२४ रोजी आयोजित त्यांच्या संबंधित सभेमध्ये संचालक मंडळाच्या आदेशान्वये मंजूर करण्यात आला आहे. वरील लेखापरीक्षित वित्तीय अहवाल बॉम्बे स्टॉक एक्सचेंज वेबसाइट (यूआरएल www.bseindia.com) व कंपनीची वेबसाइट (यूआरएल www.glancefinance.in) वर उपलब्ध आहे.
२. वरील अहवाल कंपनी कायदा, २०१३ च्या अनुच्छेद १३३ अंतर्गत विहित असल्यानुसार त्यांचा अवलंब करण्याकरिता कंपनी (इंडियन अकाउंटिंग स्टॅंडर्ड्स) नियम, २०१५ (आयएनडी एएस) अनुसार आहे.
३. कंपनी कंपनीच्या मुख्य व्यवसायांच्या अनुसार वित्तीय व गुंतवणूक उपक्रम व सर्व अन्य उपक्रम राबविण्याकरिता प्रायमरीली नियुक्त केली आहे. पुढे, सर्व उपक्रम ॲक्टच्या अंतर्गत विहित आयएनडी एएस १०८ ऑपरेटिंग सेगमेंट्स अनुसार ॲक्टच्या अनुच्छेद १३३ विभिन्नरित्या अहवाल सेगमेंट मधील असतील.
४. कंपनीने सध्या चालू वित्तीय वर्षाच्या अखेरकरिता निव्वळ उत्पन्नाच्या ५० टक्केपेक्षा जास्त वित्तीय मालमत्तांवर एकूण मालमत्ता व उत्पन्नाच्या ५० टक्के वित्तीय मालमत्तेमध्ये वाढ केली आहे. त्यामुळे, कंपनी एनबीएफसी नोंदणीकरण धारक असून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे उर्वरित ताळेबंद तारीख आहे. कंपनी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या प्रक्रियेमध्ये आहे व कंपनी कायदा, २०१३ च्या अनुसूची ३ च्या विभाग ३ अनुसार तयार केलेल्या वित्तीय अहवाला अनुसार व एनबीएफसी परवानाच्या तात्काळ सस्पेंशनकरिता अहवालीत आहे.
५. दि. ३१ मार्च, २०२४ व दि. ३१ मार्च, २०२३ अखेर तिमाहीकरिता आकडेवारी वित्तीय अहवालांचा वरील संपूर्ण निष्कर्ष लेखा समिती द्वारे मंजूर करण्यात आला आहे व दि. ३१ डिसेंबर, २०२३ व दि. ३१ डिसेंबर, २०२२ रोजी अखेर नऊ महिने अखेरकरिता आयोजित सभेमध्ये मंजूर करण्यात आला आहे.
६. मागील कालावधीची आकडेवारी/वर्षाची आकडेवारी जी वर्गीकरण करण्याच्या पुष्टी करण्याकरिता/ पुन:निर्धारित करण्यात येत आहे.

ग्लॅन्स फायनान्स लिमिटेडकरिता
सही/-
नरेंद्र कर्णावत
(संचालक)
(डीआयएन : ०००२७१३०)

ठिकाण : मुंबई
दिनांक : १८ मे, २०२४

### Change Of Name

I HAVE CHANGED MY NAME FROM SHIVANSH TIWARY TO SHIVANSH TIWARI AS PER MAHARASHTRA GAZETTE NO.M-2444386

I HAVE CHANGE MY NAME FROM SHREYA TIWARY TO SHREYA TIWARI AS PER MAHARASHTRA GAZETTE NO M-2444387

### Change Of Name

I HAVE CHANGE MY NAME FROM SANJIV TIWARI TO SANJIV TEWARI AS PER MAHARASHTRA GAZETTE NO M-2444392

I HAVE CHANGED MY NAME FROM ARUN ANANT TO ARUN ANANT MADHAVI AS PER GAZATTE NO M-2448301